~~2020-21~~ 2021-22
~~2020~~-21

**ISSN 0976-0377**
RNI. MAHMUL02805/2010/33461

International Registered & Recognized
Research Journal Related To Higher Education for all Subjects

# INTERLINK RESEARCH ANALYSIS

**Editor In Chief**
**Dr. Balaji Kamble**

RNI. MAHMUL02805/2010/33461
Interlink Research Analysis
IMPACT FACTOR 6.20
ISSN 0976-0377
Issue : XXIII, Vol. III, Jan. 2021 To June 2021


# महात्मा ज्योतीराव फुले यांचा समता विषयक विचार

**डॉ. रामचंद्र पांडुरंग पवार**
इतिहास विभाग,
नवगण शिक्षण संस्था राजूरीचे कला व विज्ञान
महाविद्यालय, चौसाळा, जि. बीड

8 **Research Paper - History**

भारताच्या पहिल्या पिढीतील अनेक समाजसुधारकांनी समतेची संकल्पना मांडलेली आढळते. उदा. राजाराम मोहनरॉय, न्यायमुर्ती रानडे, लोकहितवादी, आगरकर इ. यांनी आपआपल्या परीने जातीय विषमता व स्त्री-पुरुष भेदभाव या विरुध्द आवाज उठवला होता. ब्रिटीश राजवटीने आपले वर्चस्व गाजवल्यामुळे हवालदिल होणाऱ्या भारतीयांनी स्वकीयांच्या वर्णवर्चस्वांकडे मात्र हजारो वर्षे दुर्लक्ष करावे, इंग्रजी राज्यकर्त्याकडून समता, न्याय व सहिष्णुतेची मागणी करणारे उच्चवर्णीय भारतीय आपल्या निम्नवर्णीय देशबांधवांना मात्र त्या गोष्टी नाकारतात. यातील विसंगती या सर्व समाजहितचिंतकांनी उलगडून दाखवली होती. जातिभेदांचा आणि धर्मभेदांचा धिक्कार करुन मानवी समतेचा पूरस्कार करण्यात आपली उभी हयात वेचलेल्या फुल्यांनी माणसाचे माणूस म्हणून असलेले हक्क त्याला कोणीही, कधीही व कुठेही नाकारु शकत नाही ही भूमिका मांडली. आणि जातीभेद. निराकरण, अस्पृश्यता निवारण तसेच स्त्री-पुरुष समतेचा पाठपुरावा केला. शिक्षण, प्रबोधन, कायदा, व्यवसायमुक्ती, संघर्ष अशा मार्गाचा समताधिष्ठित समाजाच्या प्रतिष्ठापणेसाठी कसा वापर करता येईल याचा सूक्ष्म विचार फुल्यांनी केला.

तत्कालिन समाजाचे झालेले वर्गनिष्ठ विभाजन आणि त्यातून निर्माण झालेली सामाजिक व आर्थिक विषमता फुल्यांना प्रकर्षाने जाणवलेली होती. या समाजात मूठभर लोकांच्या ठिकाणी सामाजिक वर्चस्व आणि आर्थिक सत्ता केंद्रित झालेली आहे व हा वर्ग समाजातील बहुजनांची सामाजिक व आर्थिकदृष्ट्या पिळवणूक करीत आहे हे फुल्यांच्या लक्षात आलेले होते. या सामाजिक व आर्थिक वर्चस्वाचे मूलाधार आणि त्यातून निर्माण होणाऱ्या अन्यायाचे स्वरुप यांचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न फुल्यांनी केला.

या समाजातील सामाजिक वर्चस्वाची सर्व सूत्रे ब्राम्हणांच्या हाती असून ते इतरांची धर्माच्या आधारे फसवणूक व पिळवणूक करीत आहेत. धार्मिक श्रेष्ठत्व हा ब्राम्हणांच्या सामाजिक वर्चस्वाचा आधार आहे आपले हे वर्चस्व अबाधित राहावे त्यांच्या सनदशीरपणाला कोणी आव्हान देऊ नये

RNI. MAHMUL02805/2010/33461 IMPACT FACTOR 6.20 ISSN 0976-0377
Interlink Research Analysis Issue : XXIII, Vol. III, Jan. 2021 To June 2021 

यासाठी ब्राम्हणांनी अनेक क्लुप्त्या केल्या. त्यातील एक म्हणजे हिंदू समाजातील निरनिराळे वर्ण, जाती, परमेश्वराने निर्माण केलेल्याआहेत असा हिंदूच्या धर्मग्रंथात सांगितलेला सिध्दांत. वर्ण परमेश्वराने निर्माण केलेले म्हणून त्यातील श्रेष्ठतम वर्णाचे ब्राम्हणांचे-श्रेष्ठत्वही ईश्वरप्रणीत. इतरांनी ते मान्य करणे हे अपरिहार्य. फुल्यांनी या सिध्दांताचा फोलपणा दाखवून दिला व ब्राम्हणांच्या वर्चस्वाच्या मूलाधारालाच धक्का दिला. ही सृष्टी आणि अखिल मानवजात परमेश्वराने-निर्मिकाने-निर्माण केलेली आहे. परंतु मानवाची पिळवणूक करणारी ही जातिव्यवस्था "कृत्रिम" आहे. मानवानेच निर्माण केलेली आहे असे फुले वारंवार सांगतात.

रुढीवाद व कर्मकांडाचे प्रावल्य वाढवून इतरांच्या धार्मिक भावना व अंधश्रध्दा यांचा गैरफायदा घेऊन ब्राम्हण पुरोहितांनी आपले धार्मिक व सामाजिक वर्चस्व शतकानुशतके टिकविले. रुढीवाद व कर्मकांडाचे प्रावल्य हे धर्मग्रंथातील भाकडकथांनी व धार्मिक परंपरांनी जोपासले होते हे लक्षात आल्यामुळे फुल्यांनी हिंदूच्या धर्मग्रंथावरच हल्ला चढविला. हे धर्मग्रंथ ईश्वरनिर्मित नाहीत हे त्यांनी आग्रहपूर्वक सांगितले. धर्मग्रंथ व त्यातील चमत्कारिक कथा यामध्ये सत्याचा अंश फार थोडा असतो. या ग्रंथांची रचना पुरोहितांनी आपला फायदा साधावा यादृष्टीने केलेली असते हे त्यांनी सिध्द करण्याचा प्रयत्न केला.

जातिसंस्थेची निर्मिती ब्राम्हणांनी आपले सामाजिक वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी व टिकविण्यासाठी केली असे फुल्यांचे प्रतिपादन होते. ब्राम्हण हे आर्य वंशाचे. ते बाहेरुन आलेले. त्यांनी या देशातील मुळच्या पराक्रमी रहिवाशांचा, महार, मांग-आदिवासी, कुणबी इत्यादी शूद्रातिशुद्रांचा पराभव करुन त्यांना गुलाम बनविले. या शुद्रातिशूद्रांचा समाज जसाजसा वाढत चालला, त्याप्रमाणे भट लोकांस भीती वाटू लागली व त्यांनी आपले वर्चस्व अबाधित ठेवण्यासाठी जातिभेदांचे थोतांड उपस्थित करुन त्याचवर अनेक स्वहितसाधक ग्रंथ केले, व ते अज्ञानी लोकांच्या मनात भरविले. जातिसंस्थेच्या निर्मितीत व ती टिकवून ठेवण्यात वरिष्ठ वर्णीयांचे हितसंबंध गुंतलेले आहेत याचे फुल्यांनी मार्मिकपणे दिग्दर्शन केले हे मान्य करावयास हवे.

फुल्यांना झालेली सामाजिक विषमतेची व अन्यायाची जाणीव ही केवळ ब्राम्हण व शूद्रातिशूद्रांमधील संबंधापूरती मर्यादित नव्हती. स्त्री-पुरुष संबंधामधील सामाजिक विषमता व त्यातून पुरुषांकडून स्त्रियांना मिळणारी अन्यायाची वागणूक याची दखल फुल्यांनी आपल्या लिखानात व सामाजिक सुधारणेच्या कार्यक्रमात घेतलेली आढळते. स्त्री ही पुरुषाप्रमाणेंच निसर्गसिध्द मानवी हक्काचा उपभोग घेण्यास लायक असतांना पुरुष प्रधान संस्कृतीतील निर्बंधामुळे तिला ते उपभोगता येत नाही. हा एक प्रकारचा सामाजिक अन्यायच होय असे त्यांनी ठामपणे सांगितले. स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाला हिंदूच्या निरनिराळ्या धार्मिक रुढी जबाबदार आहेत. त्या अन्यायाचे खापर त्यांनी पुरुषांच्या माथ्यावरच फोडलेले आहे. एका ठिकाणी ते म्हणतात "एकंदर सर्वच स्त्रियांस

मानवी हक्क समजू देऊ नयेत" यासाठी स्वार्थी पुरुषांनी त्यांच्या शिक्षणास प्रतिबंध केला.

तत्कालीन समाजात शूद्रातिशूद्रांवर होणाऱ्या सामाजिक अन्यायाची फुल्यांनी जशी दखल घेतली तशीच त्या समाजातील कष्टकरी वर्गाच्या आर्थिक स्थितीबद्दल व पिळवणूकी विरुध्द फुल्यांनी आपला आवाज उठवला होता. तत्कालीन समाज जसा सामाजिकदृष्ट्या एकजिनसी नव्हता तसा तो आर्थिकदृष्ट्याही दुभंगलेला होता ही वास्तवता फुल्यांना जाणवलेली होती. त्या समाजातील कष्टकरी उत्पादकांचा प्रामुख्याने शेतकऱ्यांचा वर्ग त्यांची पिळवणूक करुन त्यांच्या श्रमावर परोपजीवी पध्दतीने जगणारा पुरोहित, सावकार, नोकरदार इत्यादींचा वर्ग, यांच्यामधील परस्परसंबंधाचे विश्लेषण फुल्यांनी आपल्या लिखानातून केले आहे. वस्तुतः शेतकरी हा भारतीय समाजातील सर्वात महत्वपूर्ण असा उत्पादक गट, त्याच्या श्रमातून निर्माण झालेल्या वस्तुंच्या आधारे समाजाचे व्यवहार चालतात समाजाचे पोषण करणारा हा वर्ग पण त्याच्या वाट्याला आलेले असते ते चिरंतन दारिद्र्य, शेतकऱ्यांच्या दारिद्र्याची कारणमीमांसा करतांना ज्या तीन प्रमुख कारणावर त्यांनी नेमके बोट ठेवले ते म्हणजे, लोकसंख्येचा शेतीव्यवसायावर पडणारा वाढता भार, शेतकऱ्यांची इतरांकडून होणारी आर्थिक पिळवणूक, फसवणूक आणि शेतीउत्पादन पध्दतीचे मागसलेपण.

फुल्यांच्या मतानुसार समाजातील पुरोहितांचा वर्ग हा पराभूतांचा वर्ग स्वतः उत्पादन श्रम न करता दुसऱ्यांच्या श्रमातून निर्माण झालेली संपत्ती लुबाडणारा आपल्या लिखानात पुरोहित लोक शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा व धर्मभोळेपणाचा फायदा घेऊन दान, नवसफेड, दक्षिणा, इत्यादींच्या रुपाने त्यांच्या संपत्तीचे अपहरण कसे करतात याचे वर्णन फुल्यांनी केले आहे. ब्रिटीशांच्या काळात सावकारीचा व्यवसाय करणारा मोठा वर्ग निर्माण झाला होता. फुल्यांच्या निरीक्षणानुसार या वर्गातही ब्राम्हणच अधिकांशाने, शेतकऱ्यांना लहान-सहान कारणांसाठी कोर्ट कचेऱ्या करण्यासाठी प्रवृत्त करुन त्यांना कर्जाच्या खाईत लोटून व व्याज मुद्दल यांच्यात गैरव्यवहार करुन शेतकऱ्यांच्या जमिनीची आणि संपत्तीची लूट या वर्गाकडून कशी केली जात असे याचेही विवेचन फुल्यांनी केलेले आहे.ब्रिटीशांचे राज्य कायद्यांचे म्हणूनच न्यायाचे असूनही त्यात शेतकऱ्यांची पिळवणूक होतच होती त्याचा दोष फुल्यांनी मोठ्या प्रमाणात सरकारी नोकरशाहीला दिला. सरकारी नोकरशाहीबद्दल फुल्यांना मनस्वी तिरस्कार वाटत होता. ही नोकरशाही सेवाभावी वृत्तीने काम करीत नसून शेतकऱ्यांची अडवणूक करते व ऐशआरामाचे जीवन जगते हे फुल्यांनी दाखवून दिले.

फुल्यांच्या लिखानातून आणि त्यांनी सुरु केलेल्या सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीच्या दिशेवरुन त्याना अभिप्रेत असलेल्या भावी समाजाच्या स्वरुपाची कल्पना येऊ शकते. सामाजिक व आर्थिक समतेवर आधारलेला शोषणविरहित असा समाज निर्माण करण्याचे फुल्यांचे स्वप्न होते. धर्माच्या आधारे निर्माण झालेली सामाजिक विषमता नष्ट झाली पाहिजे व सर्वजन मानव म्हणून एकत्रित आले पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. फुले हे धर्मविरोधक नव्हते परंतु त्या काळी धर्माला

RNI. MAHMUL02805/2010/33461 IMPACT FACTOR 6.20 ISSN 0976-0377
Interlink Research Analysis Issue : XXIII, Vol. III, Jan. 2021 To June 2021 

आलेले विकृत स्वरुप, कर्मकांडाचे व पुरोहित वर्गाचे प्राबल्य व लोकांच्या अंधश्रध्देचा फायदा घेऊन केली जाणारी धार्मिक पिळवणूक त्यांना मान्य नव्हती. म्हणून मानवतावादाचा पुरस्कार करणाऱ्या एका नव्या धर्माची सार्वजनिक सत्य धर्माची कल्पना त्यांनी पुढे मांडली. शूद्रातिशूद्राची सामाजिक दास्यातून मुक्तता व्हावी, जातिभेद व अस्पृश्यता नष्ट व्हावी असे जसे त्यांना वाटते होते तसेच पुरुषांनी लादलेल्या रुढींच्या जोखडातून स्त्रियांची मुक्तता व्हावी असेही त्यांना मनोमन वाटत होते. जिथे स्त्रियांना पुरुषा इतके स्वातंत्र्य व हक्क उपभोगता येऊ शकतील अशी समाजरचना त्यांना निर्माण करावयाची होती.

शूद्रातिशूद्रांनी शतकानुशतके उच्च वर्णियांची सामाजिक गुलामगिरी निमुटपणे स्विकारली याचे कारण त्यांचे अज्ञान होय. फुले म्हणतात शूद्रांतिशूद्राची 'विद्येविना मती गेली, मती विना निती गेली, निती विना गती गेली, गती विना वित्त गेले, वित्ताविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले' आपल्या निसर्गदत्त हक्कांपासून वंचित झालेले लोक आपले हक्क परत मिळू शकतील पण त्यासाठी यांचे अज्ञान दूर होणे, प्रबोधन होणे आवश्यक आहे. प्रबोधन झाल्यावर त्यांना आपल्या हक्काची जाणीव निर्माण होईल व ते बंड करुन उठतील. पारंपारिक हिंदू समाजात शूद्रातिशूद्रांना व स्त्रियांना विद्याग्रहण करण्याचा हक्क नाकारण्यात आला होता अज्ञानामुळे त्यांना स्वत्वाची जाणीव झाली नाही. त्यामुळे त्यांना शिक्षण देऊन शहाणे केल्याशिवाय अभिप्रेत असलेली सामाजिक क्रांती होणार नाही अशी फुल्यांची खात्री पटलेली होती त्यामुळे त्यांनी शिक्षण प्रसाराला सर्वाधिक प्राधान्य दिलेले दिसते. शेतकऱ्यांच्या होणाऱ्या आर्थिक पिळवणूकीलाही त्यांची 'अविद्या' च जबाबदार होती. त्यांनी आपल्या लिखानातून स्त्रियांनी व शूद्रातिशूद्रांनी शिक्षण घेऊन शहाणे व्हावे असे वारंवार सांगितले. त्यांच्यासाठी शाळा चालवून फुल्यांनी महाराष्ट्रातील सामाजिक क्रांतीची मूहूर्तमेढच रोविली. समाजातील निरनिराळ्या स्तरातील लोकांना शिक्षण देणे ही सरकारची जबाबदारी आहे हे फुल्यांनी ब्रिटीश राज्यकर्त्यांना वारंवार बजावले. शूद्रातिशूद्र विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाचा प्रसार करण्याचे व त्यांच्यावर शिक्षणाचा योग्य तो संस्कार करण्याचे कार्य स्वतःचे सामाजिक हित जपणाऱ्या व शूद्रातिशूद्राबद्दल ठामपूर्वग्रह बाळगणाऱ्या उच्चवर्णीय शिक्षकांकडून होणार नाही असे फुल्यांना वाटत होते. म्हणून त्यासाठी सरकारने त्या त्या जातीचे शिक्षक तयार करुन त्यांच्याद्वारे शिक्षण प्रसाराचे कार्य घडवून आणावे असा त्यांनी आग्रह धरला होता. तसेच सरकारने सक्तीच्या शिक्षणाचा कायदा करावा व त्यांना विशेष अशा सवलती ही द्याव्यात असा अत्यंत क्रांतीकारक विचार फुल्यांनी त्या काळात मांडला. या देशातील बहुसंख्य लोक शेतकरी पेशातील असल्याने शिक्षणातील अभ्यासक्रमाची रचना त्यांच्या व्यावसायिक गरजा लक्षात घेऊन करावी कष्टकरी वर्ग शिक्षण घेऊन सुबुध्द झाला तर ते समर्थ बनतील असा त्यांचा विश्वास होता.

ब्रिटीशांच्या राजवटीत जी नवी सत्तास्थाने प्रामुख्याने नोकरशाहीत निर्माण झाली होती ती

बहुतांशाने उच्चवर्णीयांनी काबीज केली होती त्या सत्तेचा उपयोग ते आपल्या हितसंबंधाचे रक्षण करण्यासाठी व इतरांची पिळवणूक करण्यासाठी करीत होते. ही परिस्थिती बदलण्यासाठी या सत्तास्थानाची वाटणी निरनिराळ्या जातीतील लोकांमध्ये त्यांच्या संख्येच्या प्रमाणात व्हायला हवी अशी मागणी फुल्यांनी केली होती. त्याच बरोबर सरकारने शूद्रातिशूद्र यासाठी काही जागा राखून ठेवल्या तरी त्याचा सुरुवातीला काहीही उपयोग होणार नाही कारण शूद्रातिशूद्रामध्ये शिक्षणाचा पूरेसा प्रसार न झाल्याने त्या जागांसाठी योग्य पात्रता असलेले शूद्रातिशूद्र उपलब्ध होऊ शकणार नाहीत व परिणामी त्या जागा उच्च वर्णियांनाच मिळतील अशी भीतीही त्यांनी व्यक्त केली होती. शेतकज्यांमध्ये शिक्षणाचा प्रसार झाला तर आर्थिक व्यवहारामध्ये होणारी त्यांची फसवणूक व शोषणही थांबेल परंतु त्यामुळे त्यांच्या दारिद्र्याचा प्रश्न मात्र सूटणार नाही त्यासाठी शेतकज्यांचे उत्पन्न वाढणे आवश्यक आहे. या संदर्भात त्यांनी शेतीव्यवसायाचे स्वरुप सुधारण्याची आवश्यकता प्रतिपादन केली. शेतीतून मिळणारे उत्पन्न वाढावे यासाठी शेतीसुधारणेचा कार्यक्रम सरकारने हाती घ्यावा असे त्यांनी सूचविले. शेतकज्यांकडून कर स्वरुपात गोळा केलेल्या पैशाचा उपयोग सरकारने शेतीस पाणीपुरवठा करण्यासाठी धरणे, व तलाव बांधणे, शेतास ताली घालणे, शेतकज्यांना उत्तेजनार्थ बक्षिसे देणे यासाठी करावा असे त्यांनी आग्रहपूर्वक सांगितले. तसेच शेतकज्यांना द्यावा लागणाज्या कराचा बोजा हलका केल्याशिवाय शेतकज्यांची स्थिती बदलणार नाही असे त्यांनी सरकारला वेळोवेळी बजावले होते. या सर्व कारणांनी महात्मा फुले हे त्यांच्या काळातील श्रेष्ठ समतावाद्यापैकी अग्रगन्य महात्मा ठरतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी फक्त तीनच गुरुऋण मान्य केले आहे. ते तीन म्हणजे महात्मा जोतीराव फुले, महात्मा कबीर, आणि महात्मा बुध्द. आधुनिक भारतामध्ये फुल्यांशिवाय आंबेडकरांना दुसरा कोणताही स्फूर्तीदाता, दृष्टा किंवा नेता आढळत नाही. भारतामध्ये जन्मजात चातुर्वण्याविरुध्द आणि जातिश्रेष्ठताविरुध्द सर्वंकष युध्द पुकारणारे फक्त महात्मा जोतीराव फुलेच निघाले. शूद्र, अतिशुद्रांची आणि स्त्रियांची बाजू घेऊन ब्राम्हणी संस्कृती विरुध्द तिच्या वर्चस्वाच्या सर्व अविष्काराविरुध्द प्राणपणाने लढण्याची हाक दिली फक्त फुल्यांनीच ! या आपल्या सर्वंकष बंडखोरीच्या आयुष्यात कधीही एकदासुध्दा ज्यांनी समेट केला नाही, समन्वय साधला नाही ज्यांना कधीही व्यवहार आठवला नाही असा कर्तृत्वशाली विचारवंत-कृतिवंत एकच होऊन गेला आणि तो म्हणजे महात्मा फुले ! अशा फुल्यांनी आंबेडकरांना स्फूर्ती दिली आणि आंबेडकरांनी त्यांचे ऋण अगदी मोकळ्या मनाने कृतज्ञतेने मान्य केले. फुले आणि आंबेडकरांचे हे अतूट नाते या दोघांचेही चरित्र आणि कर्तृत्व शेजारी शेजारी ठेवले तर दोन्ही समजायला मदतच होते. फुल्यांच्या प्रेरणांचा अगदी मुळ गाभा आंबेडकरांच्या हाती लागला त्यांच्या तळमळीची आच आंबेडकरांच्याच धगधगत्या जीवनकुंडात सतत प्रज्वलित राहिली. फुल्यांच्या ज्योतीवर खरीखुरी सर्वार्थाने एकच ज्योती डॉ. आंबेडकरांच्या.रुपाने पेटली आणि म्हणूनच

लाखो-कोट्यावधी अंतःकरणातील ज्योती पेटविण्याचे सामर्थ्य तिला लाभले ! समाजातील साज्या शक्तींशी झुंझ घेण्याचे लौकिक व्यवहारातील भीड किंवा भीती याची तमा न बाळगण्याचे धैर्य दोघांमध्येही एकाच कसाचे आढळते.

## संदर्भ सूची :-


१) वैद्य प्रभाकर, महात्मा फुले आणि त्यांची परंपरा, लोकवाङ्मयगृह, मुंबई, १९८२
२) कीर धनंजय, महात्मा जोतीराव फुले, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९६८.
३) महात्मा फुले समग्र वाङमय, संपा. फडके य.दी., महाराष्ट्र साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, १९९१.
४) ओम्वेट गेल, जोतीराव फुले आणि स्त्री मुक्तीचा विचार, लोकवाङ्मयगृह, मुंबई, १९९०.
५) चौसाळकर अशोक, महात्मा फुले आणि शेतकरी चळवळ, लोकवाङ्मयगृह, मुंबई, १९९०.
६) सरदार गं.बा., महात्मा फुले : व्यक्तीत्व आणि विचार, १९८१.
७) पंडित नलिनी, जातवाद आणि वर्गवाद, साधना प्रकाशन, पुणे.
८) भोळे भा.ल., महात्मा जोतीराव फुले : वारसा आणि वसा, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९९०.
९) फडके य.दी., आंबेडकरी चळवळ, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९९०.
१०) जोशी शरद, शेतकऱ्यांचा आसूड : शतकाचा मूजरा, शेतकरी प्रकाशन, शेतकरी संघटना, आंबेठाण, १९८४.
११) रेगे मे.पु., पाटील शरद, मार्क्सवाद आणि फुले आंबेडकर वाद, प्राज्ञ प्रकाशन, वाई, १९८०.